बीड । सोमवार
०७.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : ९७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक विठूरायाची महापूजा संपन्न

## महाराष्ट्र अन् बळीराजासाठी विठ्ठलाच्या चरणी फडणवीसांचं साकडं







पंढरपूर । प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पांडुरंगाची सपत्नीक शासकीय पूजा केलीय. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सपत्नीक विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात शासकीय महापूजा केली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि मुलगी दिविजा देखील उपस्थित होत्या. विठ्ठलाची महापूजा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री आपल्या कुटुंब आणि नाशिकमधील मानाचे वारकरी उगले दाम्पत्यासह रुक्मिणी मातेच्या दर्शनाला गेले. इथं रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक घालून मुख्यमंत्री फडणवीस आणि उगले दाम्पत्यांनी पूजा केली. त्यानंतर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

●मुंबईतील प्रसिद्ध विठ्ठल मंदिरांपैकी वडाळा येथील विठ्ठल मंदिर हे एक आहे. हे मंदिर पुरातन असून ४०० वर्षापूर्वीचे उभारण्यात आल्याचे मंदिराचे ट्रस्टी विश्वस्त उदय दिघे सांगतात. एका वारीत पंढरपूरला गेले वडाळ्यातील वारकरी गेले असताना चंद्रभागेत स्नान करताना त्यांना विठ्ठलाची मूर्ती मिळाली. ती मूर्ती पंढरपुरातून ते वडाळा गावात घेऊन आले. तो दगड ठेवून विठ्ठल-रखुमाईचे मंदिर स्थापन केले. मुंबईतील व मुंबई शेजारील शहरातील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे केले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा, दुधाचा अभिषेक

आज आषाढी एकादशीचा आनंदोत्सव पंढरपूरमध्ये साजरा होत आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी वारकरी पंढरी नगरीत दाखल झाले आहेत. संपूर्ण पंढरपूर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेले आहे. आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा संपन्न झाली.

▶▶ उर्वरित पान २ वर

## पंढरपूरला निघालेल्या वारकरी कुटुंबातील अल्पवयीन तरुणीवर अत्याचार करणारे अन् सोनं लुटणारे दोन नराधम पोलिसांना सापडले



पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दौंड तालुक्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराची धक्कादायक घटना समोर आली होती. पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना रात्री उशिरा रस्त्यात अडवून लुटल्याची घटना समोर आली होती. तसेच त्यांच्यासोबतच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली होती. या प्रकरणात आता मोठी माहिती समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोन आरोपींना पकडलं असल्याची माहिती समोर आली आहे. मागील दिवसांपासून पुणे ग्रामीण पोलीस या नराधमांचा शोध घेत होते. पुणे पोलिसांना या प्रकरणात दोघांना पकडण्यात यश मिळालं आहे. अमीर पठाण आणि विकास सातपुते अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या दोन्ही आरोपींनी सोमवारी (दि. ३० जून २०२५) रोजी पंढरपुरला देव दर्शनासाठी जात असताना वाटेत चहा प्यायला थांबलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

**●वारीच्या वाटेवर नेमकं काय घडलं?**

**पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल यांनी सदर घटनेची माहिती दिली होती. हे कुटुंब पंढरपूरला निघालं होतं. यावेळी ड्रायव्हरला चहा प्यायचा असल्याने दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे गाडी थांबवण्यात आली. यावेळी दोन तरुण मोटरसायकलवरुन आले आणि त्यांनी सगळ्यांच्या डोळ्यात मिरचीपूड टाकून महिलांच्या अंगावर असलेलं सोनं लुटलं. कोयत्याचा धाग दाखवत आरोपींनी कुटुंबाला धमकी दिली आणि त्यांच्याकडील सर्व दागिने घेतले. तसेच त्यांच्यासोबत असणाऱ्या १७ वर्षीय मुलीचं लैंगिक शोषण देखील केलं, असं संदीपसिंह गिल यांनी सांगितलं होतं.**

## खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

### पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद ; आरोपी अटक

बीड । प्रतिनिधी

खाजगी सावकरांची नावे चिठ्ठत लिहून एका तरूण कापड व्यावसायिकाने राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी काळा हनुमान ठाणा पेठ बीड भागात उघडकीस आली. सदरील तरूणाने लिहिलेल्या चिठ्ठीत काही राजकीय पक्षाशी संबंधीत पदाधिकाऱ्यांकडून आणि काही फायनान्सवाल्या सावकारांकडून पैसे घेतल्याचा उल्लेख असून त्यांच्याकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचे चिठ्ठीत नमुद असल्याचे समजते. याप्रकरणी दुपारी

उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. बीड शहरातील काळा हनुमान ठाणा, पेठ बीड भागातील राम दिलीप फटाले (वय ४२) यांनी राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना काल सकाळी उघडकीस आली. राम फटाले हे कपड्याचा व्यवसाय करत होते. जिल्ह्यातील आठवडी बाजारातही ते दुकान लावून कपडे विक्री करायचे. कापड व्यावसायासाठी त्यांनी काही सावकारांकडून कर्ज घेतले होते. त्या सावकारांना वेळेवर व्याज देवूनही त्यांच्याकडून सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता. त्यामुळेच त्यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले असे नातेवाईकांनी सांगितले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला होता. जोपर्यंत संबंधित

▶▶ उर्वरित पान २ वर

## धाकटी पंढरी नारायण गडावर भक्तांचा मेळावा

### मनोज जरांगे पाटलांच्या हस्ते महापुजा



बीड । प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त बीड शहरासह जिल्हाभरातील विठू-रुक्माईच्या मंदिरांमध्ये ज्ञानोबा तुकाराम, जय हरी माऊलीचा गजर करत हजारो वारकऱ्यांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले. धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगडावर आज पहाटे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली. चाकरवाडी, पोखरी, गोरक्षनाथ टेकडी यासह अन्य धार्मिक स्थळांवर भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळत होती. विठ्ठल नामाचा नामजप, ज्ञानोबा-तुकारामांचा गजर करत आषाढी एकादशीनिमित्त बीड जिल्ह्यातल्या गावागावातील विठ्ठल

▶▶ उर्वरित पान २ वर

## आंबेश्वर उद्योग समूहाचे मालक तथा मनोज जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक आदर्श सरपंच सागर आमले व अमोल आमले यांच्या कडून विठ्ठलाचे नांदुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांना महाप्रसाद




आष्टी । प्रतिनिधी

आंबेश्वर उद्योग समूहाचे मालक तथा मनोज जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक आदर्श सरपंच सागर आमले व अमोल आमले यांचा विठ्ठलाचे नांदुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना अनेक वर्षांपासून महाप्रसाद देण्याचा उपक्रम बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील नांदुर विठ्ठलाचे येथील स्वयंभू विठ्ठलाचे आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी दर्शनासाठी जात असतात.

या वारकऱ्यांना आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील आदर्श

▶▶ उर्वरित पान २ वर




## ऐतिहासिक कारंजा टॉवरवर प्रथमच झळकले नामफलक प्रशासनिक अधिकाऱ्यांना दिली आवश्यक कामांची यादी



बीड । प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवरवर प्रथमच नामफलक झळकले असून कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी आवश्यक असलेली १२ कामे करा अशी मागणी रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ़ यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराची ऐतिहासिक ओळख असलेले कारंजा टॉवर जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अत्यंत बकाल अवस्थेत गेले आहे. या ऐतिहासिक वास्तूची दुर्दशा दूर करण्याकरिता तिन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी विशेष व जातीने लक्ष घालून १) कारंजा टॉवरचे तुटलेले दार बदलून नवीन दार लावणे, २) बंद पडलेल्या घड्याळी सुरू करणे, ३) इमारतीला आतून बाहेरून रंगरंगोटी करणे, ४) इमारतीवर चारही बाजूने प्रकाश टाकणारे हाय मास्ट दिवे लावणे, ५) जवळील दोन्ही झाडांच्या टॉवर ला चिटकलेल्या फांद्या छाटणे, ६) कारंजा टॉवरच्या चारही बाजूने लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करणे, ७) कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक प्रतिबंधित सक्तीच्या कारवाया करणे, ८) इमारतीच्या पश्चिम आणि उत्तर बाजूच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे, ९) कॉंक्रिटीकरण झाल्यावर पश्चिम व उत्तर बाजूस दक्षिण बाजू सारखे सिमेंटचे बाकडे ठेवणे, १०) उत्तर बाजूस अतिक्रमण व घाण करून लावण्यात येत असलेले हातगाडे हटविणे, ११) पुन्हा अतिक्रमण केल्यास दंडात्मक कारवाई करणे, १२) कारंजा टॉवरची देखभाल आणि सुरक्षेकरिता बीड नगर परिषदे चा प्रत्येकी किमान एक-

▶▶ उर्वरित पान २ वर

# परदेशी विद्यापीठांचे आगमन



सध्या महाराष्ट्रात एक चांगले चित्र दिसत आहे आणि ते म्हणजे शिक्षणावर होत असलेली चर्चा! प्राथमिक शिक्षणामध्ये किती भाषा असाव्यात येथपासून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात परदेशी विद्यापीठांना स्थान द्यावे किंवा कसे, अशा विविध विषयांवर सर्वत्र चर्चा झडत आहेत. या सहस्रकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत सारे विश्व अगदी निकट आले आहे. करोनोत्तर काळात तर ही निकटता अधिक महत्त्वाची ठरत आहे. या निकटतेतून निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचा विचार करता शैक्षणिक क्षेत्रावर अधिक मोठी आणि परिणाम कारक कार्य करण्याची जबाबदारी आली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'ची रचना करून या धोरणाची अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केला आहे.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेला अनेक वर्षांपासून काही मूलभूत आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अभ्यासक्रमांचा जुनाटपणा, संशोधन आणि नवोपक्रम ाचा अभाव, उद्योगांच्या गरजांशी जुळणारी कौशल्य विकासाची कमतरता आणि जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेचा अभाव ही त्यातील काही प्रमुख कारणे आहेत. दरवर्षी लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात, ज्यामुळे देशाबाहेर मोठ्या प्रमाणावर भांडवल आणि प्रतिभावान मनुष्यबळही जाते. या बाबींचा विचार ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० 'मध्ये केला गेला आहे. या विचारांच्या माध्यमातून शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाची संकल्पना चर्चेत आली. त्यातच परदेशी विद्यापीठांचे भारतात आगमन हे निश्चितच स्वागतार्ह पाऊल आहे. पण यातही काही आव्हाने आणि धोके आहेत.

उच्च शिक्षणाची सद्यस्थिती- भारतात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी वाढत असली तरीही विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठी नोंदणी करण्याचे प्रमाण - ग्रॉस एन्रॉलमेंट रेश्यो (जीईईआर) - जेमतेम ३० टक्क्यांच्या आसपास आहे. हे प्रमाण अमेरिका (८८ टक्के) किंवा चीन (५१ टक्के) यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. महाराष्ट्रात अनेक नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था आणि खासगी शिक्षणसंस्था कार्यरत आहेत. परंतु याआधी गतिशील आणि दूरदृष्टी असलेल्या शैक्षणिक नेतृत्वाचा अभाव, शैक्षणिक धोरणातील कमी लवचीकता, अपुऱ्या स्वरूपाच्या पायाभूत सुविधा, राज्य विद्यापीठांना मिळणारे अपुरे आर्थिक पाठबळ, गुणवत्तेतील विषमता, संशोधनातील मर्यादा, जागतिक रँकिंगमधील पिछाडी आणि 'ब्रेन ड्रेन' ही उच्च शिक्षणासमोरील गंभीर आव्हाने आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने ५० टक्के जीईईआरचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी हजारो नव्या संस्था, दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि जागतिक पातळीवरील सहकार्य गरजेचे आहे. यासाठी भारतामध्ये परदेशी विद्यापीठांना प्रवेश देणे आवश्यक आहे आणि परदेशी विद्यापीठांनाही आता भारतामध्ये यायचे आहे.

परदेशी विद्यापीठांना भारतात का यायचे आहे?

पाश्चिमात्य देशांत शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. अमेरिका, यू.के., कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमध्ये वाढत्या स्थलांतरामुळे तिकडच्या सरकारांनी विद्यार्थी व्हिसा आणि परदेशी विद्यार्थ्यांवरील निर्बंध वाढवले आहेत. शिक्षणाच्या निधीतील कपातीमुळे हे देश आता भारतासारख्या तरुण लोकसंख्या असलेल्या मोठ्या बाजाराकडे आकर्षित होत आहेत. भारतात पाच ते २४ वयोगटातील जनसंख्या ५० कोटींपेक्षा अधिक आहे. वाढता मध्यमवर्ग आणि शैक्षणिक आकांक्षा यामुळे परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश घेणे फायदेशीर ठरत आहे. परदेशी विद्यापीठे भारतात आल्यास त्याचे भारताला कोणते फायदे होतील? आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक पद्धती, संशोधनसंधी आणि नवोपक्रम घेऊन येणाऱ्या विद्यापीठांमुळे भारतातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील अध्ययन व अध्यापनातील गुणवत्ता वृद्धिंगत होण्याची मोठी शक्यता आहे. स्पर्धा निर्माण होऊन भारतीय विद्यापीठांना आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यास प्रेरणा मिळेल. उद्योग व शिक्षणातील सहकार्य वाढून एआय, फिनटेक, क्रीडा, हवाम ान बदल अशा नवनव्या क्षेत्रांत संशोधन केंद्रे स्थापन होण्यास हातभार लागू शकतो. याचबरोबर भारतातच परदेशी विद्यापीठांचे शिक्षण उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांची परदेशात जाण्याची गरज कमी होईल.

फायदे कोणते? आव्हाने कोणती?

महाराष्ट्रातील विद्यार्थी सध्या आयआयटी, आयआयएम किंवा खासगी विद्यापीठांम ध्ये प्रवेशासाठी स्पर्धा करत असतात. परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस नवी मुंबईसारख्या ठिकाणी आल्यास आंतरराष्ट्रीय पदवीसाठी अधिकचे पैसे खर्च करावे लागणार नाहीत. विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम, क्रेडिट ट्रान्सफर, ड्युअल डिग्रीचे पर्याय अधिक खुले होतील. त्याचबरोबर येणारी काही आव्हानेही असतील. परदेशी विद्यापीठांची फी रचना त्यांच्या मूळ देशासारखी राहिली, तर ती सरासरी भारतीय विद्यार्थ्यांना परवडणार नाही. ही परदेशी विद्यापीठे भारतातील स्थानिक विषयांवर संशोधन करून जागतिक स्तरावरही संशोधन योगदान देऊन योग्य तो समतोल राखतील का? की केवळ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमावरच भर देतील? मलेशिया, चीनसारख्या देशांतील काही परदेशी कॅम्पस अपयशी ठरले. तसा अनुभव भारतातही येऊ शकतो.


यावर काय करायला हवे, याचे पहिले उत्तर म्हणजे परदेशी विद्यापीठांनी भारतीय विद्यापीठांसोबत संयुक्तपणे कॅम्पस चालवावेत. आयआयटी-मुंबई आणि मोनॅश विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे भागीदारी आधारित मॉडेल अधिक प्रभावी, परिणामकारक आणि उपयोगी होऊ शकतील. नॅक, एनआयआरएफ या सारख्या संस्थांनी या कॅम्पसची गुणवत्ता सतत तपासावी. तसेच परदेशी विद्यापीठांनी वाजवी शुल्क धोरण राबवून पारदर्शक आणि गरजेनुसार शिष्यवृत्ती असलेली फी रचना करणे अत्यावश्यक आहे. त्यांचे अभ्यासक्रम भारताच्या कौशल्य गरजांशी (जसे की एआय, पर्यावरण, शेती-तंत्रज्ञान) सुसंगत आणि उपयुक्त असावेत. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी परदेशी संस्थांबरोबर सामायिक संशोधन केंद्रांची स्थापना करून संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, कोल्हापूर यांसारख्या शहरांमध्येही कॅम्पस सुरू होण्यासाठी प्रोत्साहन देऊन प्रादेशिक समतोल राखायला हवा. त्याचबरोबर राज्य सरकारने राज्य विद्यापीठांना अधिक आर्थिक पाठबळ देऊन दर्जेदार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संपूर्णपणे नियमित भरती करणे आवश्यक आहे.

परदेशी विद्यापीठांच्या प्रवेशाकडे भारतातील संस्थांसाठी एक धोका म्हणून न पाहता, एक संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. जागतिक संस्थांसोबत सहकार्यामुळे भारताच्या शिक्षण पद्धतीला उन्नत केले जाऊ शकते. त्यासाठी योग्य नियोजन, स्थानिक गरजा आणि आर्थिक सामाजिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. ही संधी जर सूज्ञपणे वापरली, तर भारत - विशेषतः महाराष्ट्र - उच्च शिक्षणाच्या जागतिक केंद्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकू शकेल. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा, गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधींच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना जागतिक पद्धतींशी परिचित करून आंतरराष्ट्रीय आव्हानांसाठी तयार करणे ही बाब ऐतिहासिक ठरू शकते. मात्र, सम ावेशकता, पारदर्शकता आणि शाश्वतता ही तत्त्वे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ही संधी केवळ एका विशिष्ट गटापुरती मर्यादित राहील.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी असे साधन आहे. त्यासाठी नवोन्मेष, चिंतनशीलता आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी एक मजबूत शैक्षणिक प्रणाली आवश्यक आहे. त्यामुळे या नव्या वाटचालीत परदेशी विद्यापीठांशी यशस्वी भागीदारी आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षण हे आपले 'विकसित भारत' घडवण्याचे खरे मोठे योगदान ठरावे.

**(लेखक मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत.)**

# गुरुंचे जीवनातील महत्व



भारतीय संस्कृती ही पृथ्वीतलावरील सर्वात प्राचीन आणि महान संस्कृती मानली जाते. आज जगभरात भारताला जो मान सन्मान आहे तो येथील संस्कृती आणि परंपरांमुळे. काळाच्या ओघात जगातील अनेक संस्कृती लोप पावल्या. भारतावरही अनेक सांस्कृतिक आक्रमणे झाली आणि होत आहेत मात्र पुरातन भारतीय संस्कृती त्याही स्थितीत टिकून आहे. दिवसागणिक तिचे महत्व वाढत आहे. येथील कुटुंबव्यवस्था, येथील नैतिक मूल्ये, धार्मिक रूढी परंपरा, सांस्कृतिक ठेवा, ग्रंथ संपदा, सण-उत्सव, पुरातन मंदिरे आणि वास्तू, येथील ऋषी-मुनींचे संशोधन, त्यांनी हजारो वर्षांपूर्वी घालून दिलेली शिकवण यांचे आकर्षण आज पाश्चात्यांनाही आहे. त्यामुळे येथील संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आणि ती अनुभवण्यासाठी दरवर्षी लाखो संशोधक आणि पर्यटक हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येत असतात. असे म्हणतात भारताचे एका वाक्यात वैशिष्ट्य सांगायचे म्हटल्यास येथील 'गुरु-शिष्य परंपरा' असेच सांगता येईल. आजतागायत या भूमीत गुरु-शिष्याची अनेक उदाहरणे होऊन गेली ज्यांची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली. गुरूंनी आपल्या शिष्याला सर्वोत्तम घडवण्यासाठी घेतलेली मेहेनत आणि गुरूंना भगवंताच्या स्थानी मानून शिष्याने केलेली गुरूंची सेवा आणि त्यांचे आज्ञापालन यांच्या कथा आजच्या पिढीला प्रेरणा आणि संजीवनी देतात.

गुरूंचे दोन प्रकार आहेत. जे व्यावहारिक ज्ञान देऊन भौतिक प्रगती घडवून आणतात ते व्यावहारिक गुरु. आपल्या आयुष्यात असे अनेक गुरु मिळतात जे आपल्याला मार्गदर्शन करून व्यवहारातील अनेक प्रतिकूल प्रसंगातून सोडवतात तर दुसरे म्हणजे आध्यात्मिक गुरु जे तुमची आध्यात्मिक प्रगती घडवून आणून तुम्हाला जन्म मृत्यूच्या चक्रातून सोडवतात म्हणजेच आत्म्याचे परमात्म्याशी मिलन घडवून आणतात. हे तुम्हाला साधना सांगून ती तुमच्याकडून ती करवून घेतात. हे तुमच्या प्रापंचिक अडचणी सोडवत नाहीत कारण या अडचणी तुमच्या गत जन्मीच्या कर्मांमुळे आलेल्या असतात आणि त्या या जन्मात भोगल्या नाहीत तर त्यासाठी दुसरा जन्म घ्यावा लागेल हे तुमच्या मनावर बिंबवतात. या अडचणींकडे साक्षीभावाने कसे पाहायचे हे ते शिकवतात. ८४ लक्ष योनीचा फेरा पार पडल्यानंतर मनुष्य जन्म मिळतो. त्यामुळे या जन्मात साधना करून मनुष्याने भगवंताची प्राप्ती करणे म्हणजेच जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्त होणे अपेक्षित असते; म ात्र मनुष्यावर असलेल्या गतजन्मीच्या संस्काराच्या प्रभावामुळे तो मायेच्या अधीन राहून सुखात रममाण होतो, परिणामी त्याला त्याच्या ध्येयाचा विसर पडतो. हे ध्येय लक्षात आणून देण्याचे कार्य गुरु करत असतात. गुरु साधकांकडून साधना करवून घेतात आणि त्याला शिष्याच्या अवस्थेत आणतात. एकदा शिष्यावस्था प्राप्त झाली की गुरु त्याला पुढच्या टप्याची साधना सांगतात, त्याला मोक्षाची वाट दाखवतात. गुरूंच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करणारा शिष्य मानवी जन्माचे सार्थक करत. व्यावहारिक जीवनात अडचणींना सामोरे जाण्याचे बळ गुरु देतात त्यामुळे गुरूंचे जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरु-शिष्याचे अनोखे नाते असते. गुरूंच्या आज्ञेपुढे शिष्याला कशाचीही किंमत कळत नाही आणि आपल्या शिष्याची आध्यात्मिक प्रगती होत नाही तोपर्यंत गुरूंनाही चैन पडत नाही. गुरु शिष्याची भगवंताशी म्हणजेच सुख दुःखाच्या पलीकडील आनंदाशी भेट घडवून आणतात म्हणून शिष्याला गुरु हे सदैव देवाच्या स्थानी असतात.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**


## पान १ वरून पुढे...


## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते...

पत्नी अमृता फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठलाची शासकीय महापूजा केली. यावेळी विठ्ठलाच्या म ूर्तीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दुधाचा अभिषेक करण्यात आला. देवाला मुख्यमंत्र्यांनी आणलेला पोशाख परिधान करण्यात आला. त्यानंतर विठ्ठलाची आरती करण्यात आली. विठ्ठलाच्या पूजेनंतर रुक्मिणी मातेची देखील मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजा संपन्न झाली. दरम्यान, महिनाभर वारी करत चालत असणारे वारकरी विठूरायाच्या दर्शनासा ठी पंढरी नगरीत दाखल झाले आहेत. यंदा नाशिकचे उगले दाम्पत्य हे मानाचे वारकरी ठरले आहेत. मूळचे नाशिक जिल्ह्यातील जातेगावचे असलेले कैलास उगले आणि कल्पना उगले यांना विठूरायाच्या महापूजेचा मान मिळाला आहे. मुख्यमंत्री आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते मानाचे वारकरी ठरलेल्या उगले दाम्पत्याचा शाल आणि विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन यावेळी सन्मान करण्यात आला.

### शेतकरी, कष्टकरी व सर्व जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना:मुख्यमंत्री

देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त आज पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी पत्नी अमृता आणि कन्या दिवीजा यांच्यासमवेत शासकीय महापूजा करण्याचे सौभाग्य लाभले. यावेळी विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनाने मन प्रसन्न झाले आणि विठुमाऊली व रखुमाईच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील शेतकरी, कष्टकरी व सर्व जनतेच्या सुख-समृद्धी व महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रार्थना केली. अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

### वडाळा येथील विठ्ठल मंदिररात एकनाथ शिंदे यांनी केली सहकुटुंब पूजा

दुसरीकडे वडाळा येथील प्रति पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विठ्ठल रखुमाई यांचा अभिषेक सोहळा पार पडत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहकुटुंबीय मंदिरात दर्शनासाठी पोहचले आहेत. त्यांच्यासोबत आमदार प्रसाद लाड, आमदार कालिदास कोळंबकर शिवसेना नेते शीतल म्हात्रे उपस्थिती आहेत.

## पंढरपूरला निघालेल्या...

वारकऱ्यांना लुटलेलं होतं. त्याचबरोबर या नराधमांनी एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला होता. आज दोन्ही आरोपींना बारामतीतील कोर्टात हजर करण्यात येणार आहे. सोमवारी (दि. ३० जून २०२५) पहाटे साडे चार वाजण्याच्या सुमारास काहीजण पुणे-सोलापूर महामार्गावरून चारचाकी वाहनाने पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात असतानाच दौंड तालुक्यातील चिंचोली परिसरात चहा पिण्यासाठी थांबले. चहा घेतल्यानंतर सर्वजण पुन्हा कारमध्ये बसत होते. त्याचवेळी दोन अज्ञात हल्लेखोर त्याठिकाणी दुचाकीवर आले. त्यांनी काही कळायच्या आत दोघांनी सोबत आणलेली मिरचीपूड तोंडावर फ ेकली. यानंतर आरोपींनी महिल्याच्या अंगावरील दीड लाखांचे दागिने लुटले. आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी एका अल्पवयीन मुलीच्या गळ्याला कोयता लावून तिला फरपटत परिसरातील टपरी शेजारी असलेल्या नाल्याजवळील झाडीत नेलं. याठिकाणी दोघांनीही अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला. यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. आता पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. त्यांची कसून चौकशी केली जात आहे.

## खाजगी सावकारांच्या...

सावकारांविरुध्द कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. अखेर दुपारी उशिरा नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. दरम्यान मयत राम फटाले यांन आत्म हत्यापुर्वी सहा पानाची एक चिठ्ठी लिहून ठेवल्याचे समजते. त्यामध्ये काही राजकीय पक्षाशी संबंधीत पदाधिकाऱ्यांकडून पैसे घेतल्याचा तसेच काही फायसान्सवाल्या सावकारांकडूनही रक्कम घेतल्याचा उल्लेख असल्याचे सुत्रांनी सांगितले.

## धाकटी पंढरी...

मंदिरात आज सकाळपासून वारकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी विठ्ठल नामाचे भजन, नामस्मरण करत जो तो विठ्ठलाच्या पायी नतमस्तक होताना दिसून येत होता. धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगडावर लाखोंच्या संख्येने भ३तांची हजेरी दिसून आली. भल्या पहाटे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली. बीड जिल्ह्यातल्या ठिकठिकाणच्या विठ्ठल मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.

## आंबेश्वर उद्योग...

सरपंच सागर आमले व अमोल आमले यांच्या वतीने नांदुर येथे जाणाऱ्या दिंडयांना व हजारों वारकऱ्यांना महाप्रसाद दरवर्षी प्रमाणे यंदा हि अहिल्यानगर - बीड हद्दीवर आंबेश्वर उद्योग समूह येथे देण्यात आला यावेळी त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य वारकऱ्यांना महाप्रसाद वाटप करत होते

## ऐतिहासिक कारंजा...

एक कर्मचारी दिवस-रात्र कायमस्वरूपी नियुक्त करणे ही कामे युद्ध पातळीवर करणे आवश्यक आहे. असे बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन विभागाचे अधिकारी संभाजी वाघमारे आणि बीड नगर परिषद कार्यालयात उपमुख्याधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच या ऐतिहासिक वास्तूसाठी नागरिकांनी पुढे येऊन ५ कामे स्वतः केली आहेत. इथे सिमेंटचे १० बाकडे ठेवले, २ इलेक्ट्रिकल मोटारी लावल्या, रंगबिरंगी लाइट्स लावून सुरू केल्या, पाण्याचे फवारे सुरू केले आणि इतिहासात प्रथमच कारंजा टॉवर लिहिलेले नामफलक ही लावण्यात आले आहे. प्रशासनिक अधिकाऱ्यांना आता फक्त उरलेली १२ कामे करावी लागणार आहेत. ती कामे तिन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन पूर्ण केली तर या ऐतिहासिक वास्तूचे जतन व संगोपन चांगले होईल. अन्यथा या ऐतिहासिक वास्तुची दुर्दशा दूर करण्याकरिता आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशाराही ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेश राव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी निवेदनातून दिला आहे.


## पान ४ वरून पुढे...


## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ....

सामाजिकता, सृजनशीलता आणि आत्मविश्वास विकसित करण्याच्या दृष्टीने हे उपक्रम उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन जगदीशराव शिंदे यांनी केले.या कार्यक्रमास ग्रामस्थांनी देखील मोठा प्रतिसाद दिला. पालक आणि नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत उपक्रमाचे स्वागत केले.या उपक्रमासाठी सांस्कृतिक प्रमुख श्रीमती काळे म ीरा ,श्री नाईकवाडे सर,क्रीडा शिक्षक धर्मराज काळे,कदम बाळासाहेब,व इतर ५ ते १० वी च्या शिक्षकांनी दिंडीचे उत्कृष्ट नियोजन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्म रणीय ठरला असून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन केले जाईल, असे सी.सी.आर.टी .क्लब प्रमुख मंगेश रोटे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी गोड भात खाऊन सांगता करण्यात आली.

## खा.सोनवणेंच्या...

यांनी रक्तदान केले आहे, रक्तदान नंतर सामाजहिताचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे खुर्शीद आलम यांनी म्हटले आहे, यावेळी निवृत्त पोलिस उपनिरीक्षक खाजा पाशा साहेब, पठाण जफर सर, हकीम मन्यार सर, शेख अकील भाई, नईम भाई,फेरोज भाई, शितोळे साहेब, आमेर भाई इनामदार, शहिंशा भाई, मुम ताज भाई, राजु शिंदे, शमशीर भाई, सोहेल भाई, शहेबाज भाई, जावेद भाई यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते

## सेवानिवृत्तीनंतरही...

शिवछत्र चे दरवाजे आपणास साठी नेहमी खुले आहेत . असे म्हटले. या प्रसंगी सत्कारमूर्तींचा कुटुंबासह मा. काका व मान्यवरांच्या,व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ड. चव्हाण, माजी सरपंच सतीश चव्हाण, शाळेचे जेष्ठ शिक्षक सायंबर सर यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री.अरुण हाटकर सर, सूत्रसंचालन गाडे सर,तर सत्कारम ूर्तींचा परिचय गव्हाणे सर यांनी करुन दिला. तर आभार गायकवाड सर यांनी मानले. सत्कारमूर्ती गायकवाड सर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता होऊन सर्वांनी भोजनाचा लाभ घेतला. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, गावातील पदाधिकारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पत्रकार अदीजन उपस्थित होते.

## शासकीय धान्य...

पुरवठाधिकारी बीड यांच्या समक्ष बैठकाही झाल्या मात्र हमाल बांधवांच्या वाट्याला फक्त आणि फक्त आश्वासनच मिळाले आहेत हमाल मापाडी करणारे लोक हे काही करोडपती नाहीत गरीबाच्या तोंडात चार घास पोहोचवणारे गरीबच आहेत मात्र सरकारकडून दुर्लक्षित झालेले गरीब यांचा तरी संसार चालणार कसा नव्यानेच रुजू झालेले बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या गोर गरिबांच्या आर्थिक विवेचनेकडे लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावतील अशी अपेक्षा जिल्ह्यातील हमाल मापाडी व्यक्त करत आहेत या उपरही सरकारला आणि जिल्हा प्रशासनाला जाग न आल्यामुळे राजकुमार घायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुकादम वैजनाथ शिंदे , दशरथ शिंदे, विजय साळवे, पांडुरंग शिंदे , लक्ष्मण होके , गोविंद होके, देविदास होके, राजेभाऊ वाघमारे, ज्योतीराम खामकर, वैभव पारवे सह तालुक्यातील, सर्व हमाल दिनांक ३ जुलै २०२५ पासुन काम बंद आंदोलन करत असल्याने अनेक गावात धान्य पोहचवण्यास बाधा पोहचत आहे याची जिह्वा प्रशासणाने दाखल घेऊन हमाल मापडी वर्गाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी ही जनतेतून होत आहे.

## घागरवाडा येथे...

शाळेचे मुख्याध्यापक यांनी शिक्षण विभागाला अहवाल पाठवला होता का नाही यावर आता शंका व्यक्त केले जात आहे.


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विठू नामाच्या गजरात मुलांनी दुमदुमली ईट नगरी



**ईट । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ईट येथील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आषाढी वारीच्या निमित्त ईट गावांमध्ये दिंडी काढली या दिंडी प्रदर्शनामध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या गणवेशामध्ये दोन विद्यार्थी देवाचे दर्शन देत होते त्यामध्ये गावातील सर्वच भाविक भक्तांनी या दिंडीचा आनंद घेतला तसेच गावातील भजनी मंडळ यांनी देखील अभंग गवळणी तसेच विठूनामाचा गजर करीत दुमदुमली ईट नगरी तसेच हनुमान मंदिर येथे गावकऱ्यांनी सर्व मुलांना फराळाचं पण व्यवस्था केली त्यासोबतच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मुरकुटे सर तसेच गंधगे सर खोसे सर देशमुख सर व सहकारी त्यांच्या महिला स्टॉप कुलकर्णी मॅडम ढाकणे मॅडम पद्म मॅडम गंभीर मॅडम तसेच गावातील महिला मंडळ भजनी मंडळ मधील रामप्रसाद अशोक डोईफोडे तुकाराम नरनाळे विलास डोईफोडे प्रकाश डोईफोडे साहेब नरनाळे इतर गावकरी होते या दिंडीमुळे ज्या भाविक भक्ताला पंढरपूर येथे जाण्याचा योग आला नाही त्या भावी भक्ताला ईट येथेच या बालकलाकाराने पंढरपुराचे दर्शन घडवले त्यामुळे गावकऱ्यांनी जिल्हा परिषद शाळेचे खूप खूप आभार मानले.



*मराठा सेवा संघा तर्फे गुणवंतांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी धनश्री बापूसाहेब शिंदे हिने सायन्स ओलंम्पियाड मध्ये सेकंड रँक ( सिल्वर मेडल ) प्राप्त केल्याबद्दल सन्मान केला तर विश्वराज बापूसाहेब शिंदे मराठवाडा विभागात सिल्वर मेडल प्राप्त केल्याबद्धल प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉक्टर अशोक थोरात साहेब मराठा सेवा संघाचे जेष्ट मार्गदर्शक अर्जुनराव तनपुरे सर, श्रीराम बहिर सर, डॉक्टर संजय गायकवाड सर आणि डोके सर.*

## दगडी शहाजानपूर येथे वृक्षदिंडी, वृक्षारोपण उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषी महाविद्यालय बीड येथील कृषीदुतांनी मौजे दगडी शहाजानपूर येथे महाराष्ट्र कृषी दिनानिमित आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मुखमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंती या कार्यक्रमाचे औचित्य साधून दगडी शहाजानपूर गावामध्ये विविध प्रकारचे रोपे लावण्यात आली व एक अती उत्साहमध्ये वृक्षदिंडी व वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

## शाळेच्या विरोधात बातम्या का छापल्या म्हणत संपादक खमरुल इमान यांच्यावर संस्था चालकासह शिक्षकाकडून हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

संस्थेच्या शाळांविरुध्द बातम्या का छापल्या ? असे म्हणत दै. बीड संघर्षचे संपादक खमरुल इमान यांच्यावर संस्थाचालक सईद मिर्झा बेग व शिक्षक कागजी एकरार यांनी हल्ला केल्याची घटना काल रात्री झमझम कॉलनीतील कौसर चौकात घडली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तक्रारीवरून संस्थाचालक सईद मिर्झा अन्वर बेग व शिक्षक कागजी एकरार अहेमद असरार अहेमद (दोघे रा. कागदी वेस, बीड) यांच्याविरुध्द शहर पोलिस ठाण्यात एनसी दाखल झाली आहे. दरम्यान संपादकावर झालेल्या हल्ला प्रकरणाचा पत्रकार संघटनांकडून निषेध व्यक्त केला जात असून उद्या सर्व पत्रकार पोलिस अधिक्षकांना भेटणार आहेत.

बीड येथील दै. बीड संघर्षचे संपादक मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाझ हे दि.५ जुन रोजी रात्री सव्वा आकरा वाजण्याच्या सुमारास घरी असतांना त्यांना कागजी एकरार यांनी फोन करून सईदभाई, तुम्हाला बोलणार आहेत, त्यांच्याशी बोला असे म्हणताच खमरुल इमान यांनी मला कोणाशी बोलायचे नाही असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर खमरुल इमान हे घराजवळील कौसर चौक येथून जात असतांना कागजी एकरार यांनी मला आवाज देवून बोलावून घेतले व त्याठिकाणी असलेल्या संस्था चालक सईस मिर्झा अन्वर बेग यांनी माझ्या शाळेच्या विरोधात बीड संघर्ष पेपरमध्ये बातम्या का छापतो असे म्हणत शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. माझ्या शाळेबद्दल माफिनामा छाप असे म्हणत सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तक्रारविरुध्द सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार या दोघांविरुध्द एनसी दाखल करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय कॉँग्रेस धारूर तालुकाध्यक्षपदी सिद्धेश्वर रणदिवे यांची फेरनिवड



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेसच्या धारूर तालुकाध्यक्षपदी सिद्धेश्वर रणदिवे यांची फेर निवड करण्यात आली. काँग्रेसचे नेते अशोकराव पाटील, आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन यांची निवड केली आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष पदाच्या नियुक्ती सुरू असून यामध्ये धारूर तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे हे पक्ष संघटनेचे चांगले काम करत असल्याने त्यांची फेरनिवड करण्यात आली आहे. ही निवड माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, काँग्रेस चे सरचिटणीस आदित्य दादा पाटील, काँग्रेस चे जिल्हा अध्यक्ष राहुल भैया सोनवणे ,काँग्रेसचे प्रवीण शेप, माजी नगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट यांच्या उपस्थित नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. यावेळी नव्याने निवड झालेले तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे म्हणाले की पक्ष संघटना बांधणी करून आगामी जिल्हा परिषद व नगर परिषद ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये शहरातील व तालुक्यातील तरुणांना संधी देणार आहोत. या निवडीबद्दल धारूर तालुक्यातून राष्ट्रीय काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते अभिनंदन करून शुभेच्छा देत आहेत.

## चकलांबा सर्कल मध्ये पावसाने दांडी मारल्याने शेतकरी झाले हवदिल शेतकऱ्याला शासनाने मदत करावी शिवसेनेचे युवा नेते इरफान कादरी मागणी

**चकलाबा । प्रतिनिधी**



परिसरात जुन महिन्याच्या सुरवातीला झालेल्या जेमतेम पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पेरणी केलेली पिके मातीतून कोंब बाहेर पडत नसल्याने बियाणे कुजले आहे, तर काही कोवळी पिके उन्हात कोमेजून जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले असून दुभार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.चकलबा परिसरात जुन महिन्याच्या सुरवातीला झालेल्या जेमतेम पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पेरणी केलेली पिके मातीतून कोंब बाहेर पडत नसल्याने बियाणे कुजले आहे, तर काही कोवळी पिके उन्हात कोमेजून जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले असून दुभार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.यंदा गेवराई तालुक्यातील काही भागात जून महिन्यात काही पडला नाही. जून महिन्यात सगळी नक्षत्र कोरडी ठाक गेली. जुलै महिन्यात तुरळक पाऊस पडला जमिनीत पाणी काही प्रमाणात जिरल्याने ओलावा तयार झाला. त्या ओलाव्यावर शेतकऱ्यांनी कापूस,तूर, मूग,यांची लागवड केली.मोठ्या प्रमाणावर खर्च करून पिके शेतात उभी केली, मात्र पिके उभी राहत नाही तोच पावसाने ओढ दिली. अनेक दिवसांपासून पावसाच्या पाण्याचा थेंब देखील पडला नाही. विहिरी उन्हाळ्यात कोरड्याठाक पडल्या आहे. त्यामुळे शेतात पिकांना पाणी पुरवठा कसा करावा असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहे. यंदाची पिके शेतात उभी करण्यासाठी उसनवारी करीत बियाणे, खते खरेदी केली आहे. मोठया प्रमाणावर आलेला खर्च पावसाच्या लहरीपणामुळे वाया जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे.शेतात लागवड केलेल्या पिकांचा पंचनामा करावा, जमिनीतुन न उगवणाजया बियाणांचा खर्च सरकारने देऊन शेतकजयांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहे.

**दुकानदारांची उसनवारी करून बियाणे खरेदी केली आहे. पावसाचा जोर कायम राहील म्हणून काळ्या मातीत बियाणे फकून मोठी जुगार शेतकरी खेळला आहे. पावसाने ओढ दिल्याने पिके उगवत नाही. उगवलेले पिके करपून गेल्याने दुभार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतकर्यांना दिलासा मिळाला यासाठी पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. – शिवसेना नेते इरफान कादरी चकलंबा**

## १० जुलै पासून वर्षावासाला सुरुवात

### परळी शहरातील भीमनगर जगतकर गल्ली येथील सुगंधकुटी बुद्धविहार येथे वर्षवासानिमित्त बैठक संपन्न परळी



**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे आज दिनांक ०६/०७/२०२५ रविवारी रोजी दुपारी बारा वाजता सुगंध कुटी बुद्ध विहार येथे येणारा वर्षावास पूज्य भंते धम्मसार तक्षशिला बुद्ध विहार किल्लारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचे आयोजित करण्यात आले असून या निमित्त बैठक घेण्यात आली असून यामध्ये विनोद जगतकर, शंकर साळवे, किरण बनसोडे सोपान ताटे, भारत ताटे, बालाजी जगतकर, प्रताप समिंदर सवळे,बालासाहेब जगतकर,सिद्धार्थ जगतकर, आनंद जगतकर संजय जगतकर,अमोल अवचारे,कपील जगतकर, वसंत बनसोडे,संतोष आदोडे, राहुल जगतकर, दीपक जगतकर, राज जगतकर, दिनेश जगतकर,आनंद ताटे यांच्यासह तर बौद्ध बांधव उपस्थित होते या बैठकीत वर्षावासानिमित्त श्रामनेर शिबिर बाल संस्कार शिबिर यासह विविध धार्मिक कार्यक्रम घेण्याचे ठरले.

# सुभाषराव पवळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

### • सुभाषराव पवळ ऊर्जादायी व्यक्तिमत्व: आ.विजयसिंह पंडित

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ऑलिव्ह हॉटेल येथे शनिवार २८ जून २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाषराव पवळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित यांची उपस्थिती होती. सत्कारमूर्ती सुभाषराव सुंदरराव पवळ प्रमुख अतिथी माजी आमदार राजेंद्र जगताप ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोकराव डक, भाजपा युवा नेते शिवराज



पवार,बीड जिल्ह्याच्या नेत्या प्रा. सुशीला मोराळे ,जेष्ठ विधीज्ञ माजी सरकारी वकील ॲड. कृष्णाजी पंडित, नारायण गडाचे विश्वस्त बी बी जाधव साहेब, ॲड.महादेव तुपे , उद्योजक नितीनराव तौर, उद्योजक राजेंद्र मनोत, उद्योजक अंगद नवले, प्रगतशील शेतकरी उद्योजक अभिजीतराव भांगे, लोकपत्रकार भागवत तावरे, संस्थाचालक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दीपक घुमरे, संस्थाचालक संभाजी करांडे ,संस्थाचालक ॲड. विश्वनाथ मगर, संस्थाचालक गणेश वाघ, संस्थाचालक उत्तमराव पवार, संस्थाचालक महादेव काळे, संस्थाचालक दिनेशलाला पवार, कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, प्राचार्य राजकुमार कदम माजी प्राचार्य जालिंदर पैठणे, मुख्याध्यापक राजेंद्र केसभट ,मुख्याध्यापक भारत मगर ,मुख्याध्यापक संजय गोरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय सुंदरराव पवळ यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन करण्यात आले. समर्थ विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनीने सर्व पाहुण्यांचे स्वागत गीताने स्वागत केले. उपस्थित पाहुण्यांचे गौरव सोहळा समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांचा सर्व पाहुण्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह,मानपत्र देऊन सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत तांबारे यांनी केले.यावेळी राजकुमार कदम, जालिंदर पैठणे, बी .बी जाधव ,भागवत तावरे, सत्येंद्र पाटील ,सुशीला ताई मोराळे यांनी शुभेच्छा व्यक्त करून पुढील वाटचालीस दादांना सदिच्छा दिल्या. माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी आपल्या शुभेच्छा मनोगतात समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सुंदरराव आप्पा यांचे स्नेहाचे संबंध तसेच इथून पुढे शैक्षणिक क्षेत्रात नवीन प्रकल्प व उपक्रम हाती घ्यावे असा मौलिक संदेश दिला. सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांनी उपस्थित सर्व अतिथींचे व उपस्थितांचे शुभेच्छा स्वीकारून आभार मानले. अध्यक्षीय भाषणात आमदार विजयसिंह पंडित यांनी पवळ कुटुंबीय हे आमच्या शिवछत्र परिवाराचा एक पिल्लर आहे सुभाषराव हे खूप ऊर्जादायी व्यक्तिमत्व आहे त्यांच्यामध्ये खूप उत्साह आहे पुढील काळात त्यांनी शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करावे असे मत व्यक्त केले. आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या जोशपूर्ण भाषणाने उपस्थिताचि मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद मगर यांनी केले. राजकीय,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व स्तरातील बहुसंख्य लोक उपस्थित होते. सर्व उपस्थितांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंद संपन्न झाला.

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र ● https://marathwadapatra.com

सोमवार, दि.०७ जुलै २०२५ पान ४

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी श्रीनिवास म. जगताप यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील आकरावी पुण्यतिथी आषाढ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. श्रीनिवास महाराज जगताप पालसिग़णकर ता.पंढरपूर जि. सोलापूर यांचे गुरुवार दिनांक १० जूलै २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. व पंढरपूरच्या काल्याचे कीर्तन आहे तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ ▶▶ उर्वरित पान २ वर



# ग्रामीण विद्यालयात 'आनंददायी दिंडी', 'दप्तरविना शाळा' व 'आनंददायी शनिवार' उपक्रम उत्साहात

**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील ग्रामीण विद्यालयात सी.सी.आर.टी. सांस्कृतिक क्लबच्या वतीने 'आनंददायी दिंडी' या विशेष उपक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, या हेतूने हा उपक्रम आखण्यात आला होता. याच अनुषंगाने 'आनंददायी शनिवार' आणि 'दप्तरविना शाळा' हे उपक्रम देखील यावेळी राबविण्यात आले.ग्रामीण विद्यालय हे बालाघाटवरील एक उपक्रमशील विद्यालय म्हणून ओळखले जाते.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून वारकरी संप्रदायातील भक्तीरसाने ओतप्रोत भरलेली दिंडी साकारली. मुलांनी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर आणि श्री विठ्ठल रुख्मिणी यांची वेशभूषा केली होती. हातात भगवे





झेंडे घेऊन हरिनामाच्या गजरात मूले सहभागी झाले.मुलींनी पारंपरिक साडी परिधान करून डोक्यावर तुळशीचे रोप, विठ्ठल मूर्ती घेऊन सहभाग नोंदवला. दिंडीचे मार्गक्रमण नेकनूर शहरातून करण्यात आले. टाळ, मृदंग, भजन, अभंगाच्या गजरात सारा परिसर भक्तिरसाने न्हालून निघाला. शाळेतील विद्यार्थी आणि बंकटस्वामी मठातील संगीत विद्यालयाचे मुले यांनी पंढरीनाथ माऊली, तुका म्हणे ध्यानाचे फळ, ग्यानबा-तुकाराम अशा अभंगांचे सादरीकरण केले. तसेच मुलां मुलींनी आणि प्राचार्या कदम मॅडम यांनी फुगड्या खेळून सर्वांची मने जिंकली.

या उपक्रमाच्या निमित्ताने शाळेत 'दप्तरविना शाळा' राबवून विद्यार्थ्यांना अध्ययनाचा वेगळा, रंजक अनुभव मिळवून दिला. कोणताही अभ्यासक्रमाचा ताण न ठेवता विविध सर्जनशील आणि सांस्कृतिक कृतीत विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला. मा.जगदिशराव शिंदे ,शाळेच्या मुख्याध्यापिका कदम के.के.सर्व शिक्षकवृंद आणि पालकांनी या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार,

▶▶ उर्वरित पान २ वर

# खा.सोनवणेंच्या वाढदिवसानिमित्त खुर्शीद आलम ने रक्तदान केले

## बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समिती विविध उपक्रम घेणार

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त आज बार्शीनाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या वतीने खुर्शीद आलम यांनी रक्तदान दिले आहे, बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेचे मंजुर असलेले रेल्वे स्टेशन काही राजकीय मंडळींनी इतर ठिकाणी करून घेतले होते म्हणून बीड शहरातील नागरिकांनी बार्शीनाका रेल्वे स्टेशन बचाव कृती समितीची



स्थापन करून खा.सोनवणेंची भेट घेऊन निवेदन दिले होते, खा.सोनवणे साहेबानी विशेष लक्ष देऊन बार्शीनाका रेल्वे स्टेशनची मंजुरी आणलेली आहे, म्हणून आज जिल्ह्याचे लोकप्रिय खा.बजरंग बप्पा सोनवणे साहेब यांचे वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमे घेऊन कार्यकर्त्यांनी वाढदिवस साजरे करत आहेत, त्यानिमित्ताने आज जिल्हारुग्णालया बीड येथे बार्शीनाका बचाओ कृती समितीचे कार्याध्यक्ष बीड न.प.चे मा.सभापती तथा श.प.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम ▶▶ उर्वरित पान २ वर

# सेवानिवृत्तीनंतरही शिवछत्र परिवार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा: रणवीर पंडित

**तलवाडा । प्रतिनिधी**

यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले श्री. गायकवाड सर श्री. आघाव सर श्री.बांगर सर यांना शाळेच्या वतीने सेवापुर्ती निमित्त निरोप देण्यात आला. याप्रसंगी शारदा स्पोर्ट अॅकॅडमी प्रमुख मा.रणवीर काका पंडित, यांच्यासह मा.साहेबराव चव्हाण, (संचालक जयभवानी सहकारी साखर कारखाना)

मा.साहेबराव पांढरे (माजी जि.प.सदस्य) तसेच मा.शंकरराव पवार (चेअरमन सेवा सहकारी सोसायटी) या सोबतच संस्थेचे सह प्रशासकीय अधिकारी गोगुले सर, लेखाधिकारी हाटोटे सर, गावातील पदाधिकारी, पत्रकार



जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील शिक्षक ,कर्मचारी मुख्याध्यापक, प्राचार्य उपस्थित होते. यावेळी मा. रणवीर काका पंडित यांनी तुम्ही सेवानिवृत्त झाला तरी ▶▶ उर्वरित पान २ वर





*चाकरवाडी: आषाढी एकादशी निमित्त श्री.क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादांच्या समाधीचे दर्शन घेतले या वेळी ह.भ.प.महादेव महाराज यांचे शुभ आशीर्वाद घेतले या वेळी बाबांनी यथोची सह कुटुंब सत्कार केला. मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे सर आणि वहिनी यांनी माऊली न्यूज चे संपादक अभिजीत पवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांचा सन्मान करताना पवार कुटुंबीय.*

# शासकीय धान्य गोदामात काम करणाऱ्या हमालांचे गेल्या सहा महिन्यापासून मानधन नाही

## गरीबाचा संसार चालणार कसा ; तात्काळ पैसे द्या

### हमाल मापाडी संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे याचना

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गावागावात सरकारचे धान्य साठविण्यासाठी मोठे मोठे गोदाम निर्माण केलेले आहेत सदर गोदामातून खेड्यापाड्यातील गावोगावच्या राशन दुकानावर माल पोहोचवण्यासाठी हमाल, मापाडी यात महत्त्वाची भूमिका बजावतात, गोरगरिबाच्या तोंडात सुखाचे दोन घास जावेत म्हणून तळमळ करतात गोदामातून गाडी भरायची आणि पुन्हा ती गाव गावच्या खेड्यात खाली करायची एवढं परिश्रम घेणारी हमाल मापाडी लोक मात्र सध्या उपाशी असल्याचे दिसत आहेत गेल्या सहा महिन्यापासून जिल्ह्यातील हमाल मापडी यांना मानधनच दिले गेले नसल्याने गोर गरीबाच्या तोंडात चार घास घालणारे हमाल मापाडी उपाशी राहणे हे बीड जिल्ह्यातील जनतेला कसे योग्य वाटेल हमाल मापाडी संघटनेच्या वतीने अनेक वेळा निवेदन देऊन मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त संभाजीनगर, जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

## राधिका चव्हाण सिए परीक्षा उत्तीर्ण



**माजलगाव । प्रतिनिधी**

शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांची भाची कु. राधिका दिलीपराव चव्हाण ही ६०० पैकी ३२९ गुण घेऊन सीए ची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे तिचे यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया च्या वतीने घेण्यात आलेल्या संभाजीनगर येथून सीए परीक्षेमध्ये माजलगावचे शिवसेना शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांची भाची कु. राधिका दिलीपराव चव्हाण ही ६०० पैकी

# घागरवाडा येथे छताचा गिलावा विद्यार्थ्यांचे डोक्यात पडल्याने विद्यार्थी जखमी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तालूक्यातील घागरवडा येथील जि.प.प्राथमिक शाळेचा जिर्ण झालेला छत गिलावा कोसळल्याने एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला.जि प प्राथमीक शाळेचे आठवीचे वर्गात जेवनाचा डब्बा आणण्यासाठी वर्गात गेलेल्या विद्यार्थ्याचे डोक्यात छताच्या गिलावाचा भाग पडल्याने विद्यार्थी अदिनाथ दत्तू नागरगोजे हा डोक्यात मार लागल्याने जखमी झाला शिक्षकानी तात्काळ पालकाला बोलवून त्याला उपचारा साठी पाठवले खाजगी रुग्नालयात उपचारा साठी नेले असता दोन टाके पडले विद्यार्थ्याची प्रकृती ठिक आहे माञ छताचा गिलावा पडत असताना ईथे वर्ग का भरवला या बाबत वरीष्ठाना शाळे मार्फत पत्रव्यवहार झाला का असा प्रश्न



पालकातून केला जात आहे.

धारूर तालुक्यातील घागरवाडा येथे जिल्हा परिषद शाळेचे छताचा गिलावा कोसळून आठवी वर्गात दुपारचा डब्बा आणण्या साठी दि. ०४/०७ / २०२५ वार शुक्रवार विद्यार्थी अदिनाथ दत्तू नागरगोजे हा गेला असता विद्यार्थ्यांला डोक्याला गंभीर ईजा झाली विद्यार्थ्याचे पालकास बोलवून खाजगी रुग्णालयात पाठवण्यात आले डोक्याला जखम होऊन दोन टाके पडले आहेत व विद्यार्थ्याची प्रकृती ठिक आहे माञ वर्ग सुरू नसल्याने ईतर विद्यार्थी माञ या घटने पासून बाहेर असल्याने बचावले जिल्हा परिषद शाळेची इमारत किती दिवसापासून जीर्ण अवस्थेत होती व इतर वर्ग खोल्या व्यवस्थित आहेत का याकडे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने तपासणी करण्याची मागणी घागरवाडा ग्राम स्थांकडून केली जात आहे शाळेची जीर्ण झालेली इमारत याबाबत संबंधित ▶▶ उर्वरित पान २ वर

**● या बाबत आपणास माहीती नाही माञ आता आपण कळवले आहे - मुख्याध्यापक आगळे**

**शाळेचे मुख्याध्यापक नुकतेच सेवानिवृत्त झाल्याने माझ्या कडे तात्पुरता मुख्यध्यापक पदाचा कारभार असून मी तात्काळ घटना घडताच वरीष्ठाला कळवले असून जुन्या मुख्यध्यापकानी शाळेचे युडायस ला नोंद केल्याचे समजते असे प्रभारी मुख्याध्यापक महादेव आगळे यांनी सागितले.**

**● प्रकरण दडपण्याचा मुख्याध्यापकाचा प्रयत्न**

**घागरवडा जि.प शाळेचा छताचा गिलावा कोसळून विद्यार्थी जखमी झाल्याच्या प्रकाराची जास्त वाच्यता होऊ नये.म्हणून मुख्याध्यापक यांनी प्रयत्न करत ही घटना दडपण्याचा प्रयत्न केला.परंतु ग्रामस्थांनी आवाज उठवल्याने हा प्रकार उघडकीस आला.**

# अब्दुल कदीर यांना समाजरत्न गौरव पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथील राज्यभरात विविध सामाजिक कार्याद्वारे परिचित असणारे शहा अल्पसंख्याक संस्थेचे सचिव तसेच पोलीस हक्क संघर्ष संघटनेचे उपाध्यक्ष अब्दुल कदीर यांना महाराष्ट्र रफ्तार न्यूज मराठी यांच्याकडून महाराष्ट्र समाजरत्न गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.

अब्दुल कदीर यांनी शहा अल्पसंख्याक संस्थेच्या माध्यमातून तसेच पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचाराविरोधी कायदेशीर लढा, पोलीस बांधवांचे विविध प्रश्न, दिवाळी-रमजानच्या वेळी नगर पालिकेकडून शहरातील स्वच्छता आणि पथदिवे उभारणीसंबंधी केलेले सामाजिक कामे याबरोबरच समाज बंधु-भगिनींचे विविध प्रश्नावर केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र समाजरत्न गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. सदरील पुरस्काराचे वितरण दि.०७ जुलै २०२५ रोजी हॉटेल पंजाबी धामी, बायपास रोड उमरगा, जि.धाराशिव येथे होणार असून याबद्दल त्यांचे मित्रपरिवार, संघटनेचे पदाधिकारी मान्यवरांमधून अभिनंदन होत आहे.




CMYK